महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकीर्ण-२००५/प्र.क्र.२०७/स्वासैक-१,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : १२ डिसेंबर, २००५

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी.

विषय : **स्वातंत्र्य सैनिक सन्मान निवृत्ती वेतन योजना १९८० अंतर्गत स्वातंत्र्य सैनिकावर अवलंबून असलेल्या पात्र व्यक्तींना स्वातंत्र्य सैनिकाच्या निधनानंतर एकाच पात्र व्यक्तीस निवृत्ती वेतन देण्याबाबत.**

उप सचिव, भारत सरकार गृह मंत्रालय यांनी लिहिलेल्या दि.२२.११.२००५ च्या पत्राची प्रत त्या सोबतच्या सहपत्रासह या सोबत जोडली आहे.

२. केंद्र शासनाच्या उपरोक्त पत्रात पुढीलप्रमाणे सूचना नमूद केल्या आहेत :-

(१) स्वातंत्र्य सैनिक सन्मान निवृत्ती वेतन योजना, १९८० अंतर्गत स्वातंत्र्य सैनिकावर अवलंबून' असलेल्या पात्र व्यक्तींपैकी स्वातंत्र्य सैनिकाच्या निधनानंतर एकाच पात्र व्यक्तीस निवृत्ती वेतन मंजूर करण्यात यावे. स्वातंत्र्य सैनिकावर एकापेक्षा अधिक अवलंबून असलेल्या पात्र व्यक्ती असल्यास कुटूंब निवृत्ती वेतन मंजूर करण्याचा त्यांचा क्रम पुढीलप्रमाणे असेल - **विधवा पत्नी/विधूर पती, अविवाहीत व बेरोजगार मुली, आई व वडिल.**

(२) स्वातंत्र्य सैनिकाच्या निधनानंतर त्यांच्यावर अवलंबून असलेल्या पात्र, अवलंबित व्यक्तींना पेन्शन मंजूर करण्याचे अधिकार संबंधित निवृत्ती वेतन संवितरण अधिका-यांना (कोषागारे/ सार्वजनिक क्षेत्रातील बँका) यांना केंद्रीय गृह मंत्रालयाच्या पत्र क्रमांक ८/१७/८९-एफएफ(पी) दिनांक २४.१०.१९९० आणि १.५.१९९२ अन्वये दिलेले आहेत.

(३) विधवा वारस पत्नींस स्वातंत्र्य सैनिका इतके पूर्ण कुटूंब निवृत्ती वेतन मंजूर करण्यात यावे.

(४) अर्जदाराने त्याच्या अर्जात एकापेक्षा अधिक कायदेशीर पत्नी असल्याचे नमूद केले असल्यास, सदर कुटूंब निवृत्ती वेतनाची रक्कम सदर विधवा पत्नींना समप्रमाणात वाटून देण्यात यावी असे केंद्र शासनाने त्यांच्या क्रमांक ८/१२/९८-एफएफ(पी) दि.१३.१०.२००० च्या पत्रान्वये कळविले आहे.

५) हिंदु विवाह कायदा, १९५५ मधील तरतूदीनुसार पहिली पत्नी हयात असतांना दुसरा विवाह करणे बेकायदेशीर आहे. सदर कायदा लागू होण्यापूर्वी केलेल्या विवाहाच्या संदर्भात दुसऱ्या विवाहाची वैधता त्या वेळच्या प्रचलित कायद्यानुसार तपासण्यात यावी. इतर विवाहासंदर्भात (हिंदु विवाह कायद्या व्यतिरिक्त) संबंधित व्यक्तींना त्यांना लागू असलेल्या कायद्यानुसार दुसऱ्या विवाहाची वैधता तपासण्यात यावी. थोडक्यात उपरोक्त नमूद बाबी लक्षात घेवूनच कायदेशीर विवाह केलेल्या दुसऱ्या पत्नीस स्वातंत्र्य सैनिक कुटूंब निवृत्ती वेतन मंजूर करणे आवश्यक आहे. केवळ कायदेशीररित्या विवाह केलेली दुसरी पत्नीच फक्त स्वातंत्र्य सैनिक वारसकुटूंब निवृत्ती वेतनासाठी पात्र असेल.

६) स्वातंत्र्य सैनिकाच्या निधनानंतर त्यांच्यावर अवलंबून असलेल्या पात्र व्यक्तींना कुटूंब निवृत्ती वेतन हस्तांतर करण्यापूर्वी उपरोक्त सूचना लक्षात घेवून सर्व संवितरण अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी अशा केंद्र शासनाच्या सूचना आहेत.

३. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या उपरोक्त सूचना आपल्या जिल्हयातील संबंधित बँकांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत योग्य ती आवश्यक कार्यवाही करावी.

(रा.म.घाडगे)
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.**

सोबत : वरीलप्रमाणे

*प्रत माहितीसाठी :-*
*विभागीय आयुक्त,*
*सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.*